दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ८० • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१६ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## राज्यातील शाळांसाठी आता सीबीएसई पॅटर्न

# शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत निर्णय-मंत्री दादा भुसेंनी दिली माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. शालेय शिक्षणात महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असल्याचा विश्वास देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. त्यात आता राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. याबाबत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी माहिती दिली आहे. शिवाय राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत अनिवार्य होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.
शालेय विभागाची बैठक झाल्यानंतर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. यावेळी बोलताना दादा भुसे म्हणाले, सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श [...] त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले आहे.पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, केंद्रीय शिक्षण पद्धतीच्या गरजेनुसार अवलंब केला जाईल. चालू वर्षात पहिलीच्या वर्गात सीबीएसई पॅटर्नचा विचार आओण करत आहोत, पुढच्या टप्प्यात सीबीएससी पॅटर्नच्या काही चांगल्या बाबी आपण शाळांमध्ये घेऊ, असे दादा भुसे यांनी म्हटले. सन २०२६-२७ मध्ये सीबीएसई पॅटर्नचा वापर होईल, असेही दादा भुसे यांनी नमूद केले.राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे राष्ट्रगीतापाठोपाठ राज्यगीत म्हणणे अनिवार्य असल्याचेही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे. परिपाठावेळी राज्यगीत म्हणण्याचा नियम आहे, परंतु राज्यातील अनेक शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत लावणे सक्तीचे असल्याचे भुसे यांनी स्पष्ट केले. तसेच प्रत्येक शाळेमध्ये मराठी भाषा शिकवणे सक्तीचे असल्याचेही भुसे यांनी सांगितले.



## कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी हत्येच्या सहभागाची होणार चौकशी



**बीड (वृत्तसंस्था)**-खंडणी प्रकरणातील आरोपी आणि धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराडच्या रिमांडवर आता केज न्यायालयाऐवजी बीड जिल्हा न्यायालयातील विशेष मकोका कोर्टात सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान तपास अधिकाऱ्यांकडून नवनवीन दावे आणि माहिती कोर्टासमोर सादर करण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने वाल्मीक कराडला ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, एसआयटीने १० दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती.
वाल्मीक कराडला विशेष मकोका न्यायालयाने ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली आहे. मकोका कायद्यांतर्गत ही कोठडी देण्यात आली आहे. या ७ दिवसांत वाल्मीक कराड याचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभाग होता का? यासह विविध बाबींची चौकशी एसआयटी करणार आहे.

### मोदींनी केला राज ठाकरेंचा खास उल्लेख

## राज यांनी जसा गुजरातचा अभ्यास दौरा केला होता तसे दौरे करण्याची केली सूचना

**मुंबई (वृत्तसंस्था)**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी महायुतीच्या आमदारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा खास उल्लेख करून सत्ताधारी आमदारांना त्यांच्यासारखे अभ्यास दौरे काढण्याचा सल्ला दिला.पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी मुंबईच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात सकाळी त्यांनी २ युद्धनौका व एका पाणबुडीचे राष्ट्रार्पण केले. त्यानंतर त्यांनी आशिया खंडातील दुसऱ्या सर्वात मोठ्या इस्कॉन मंदिराचेही उद्घाटन केले. तत्पूर्वी, महायुतीच्या आमदारांशी साधलेल्या संवादात त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा खास उल्लेख केला. राज ठाकरे यांनी २०११ मध्ये गुजरातचा अभ्यास दौरा केला होता. तसेच दौरे महायुतीच्या आमदारांनी केले पाहिजे, असे ते म्हणाले.
मोदी म्हणाले, आमदारांनी लोकांमध्ये जाऊन मिसळले पाहिजे. विरोधकांवर टीका करण्यापेक्षा त्यांना आपल्या कामातून प्रत्युत्तर द्यावे. आपल्या कामावर लोकांची मते काय आहेत? हे जाणून घ्यावे. इतर राज्यात किंवा मतदारसंघात एखादी गोष्ट चांगली झाली असेल तर त्याविषयी अभ्यास दौरे आयोजित करावे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी २०११ मध्ये गुजरातमध्ये अभ्यास दौरा काढला होता. त्यांच्यासारखे दौरे आयोजित करावेत.समाजाला वेळ देताना आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नका. त्यांनाही वेळ द्या. विशेषतः स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. तसेच आपण ठरवलेली कामे निर्धाराने कशी पूर्ण होतील याचेही काटेकोर नियोजन आमदारांनी करायला हवे. मोदींनी आमदारांना महायुती म्हणून संघटना वाढवण्यावर भर देण्याचाही सल्ला दिला. ते म्हणाले, आमदारांनी संघटना म्हणून महायुती वाढवण्यावर भर द्यावा. मतदारसंघात घटकपक्षातील आपले जे आमदार व पदाधिकारी आहेत, त्यांच्या कार्यालयांना भेटी द्याव्यात. महायुतीचा एकोपा वाढवण्यासाठी गावोगावी डब्बा पार्टीचे आयोजन करावे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी मी इच्छुक नाही पृथ्वीराज चव्हाणांनी भूमिका केली स्पष्ट

**मुंबई (वृत्तसंस्था)**
विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष बदलला जाणार, अशी चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पदासाठी चर्चेत आहे. यावर पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली. प्रदेशाध्यक्ष पदासाठी मी इच्छुक नाही, असे सांगत पृथ्वीराज चव्हाण यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सध्या ज्या काही चर्चा सुरू आहे, त्याबाबतही मला माहिती नसल्याचे ते म्हणाले.
लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला नाना पटोले यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत मोठे यश मिळाले. मात्र, विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर काँग्रेसमध्ये अंतर्गत खदखद दिसून येते आहे. काही नेते अप्रत्यक्षपणे नाना पटोले यांना जबाबदार ठरवत असून त्यांना हटवण्याची मागणी पक्षातून केली जात आहे. परंतु, काँग्रेस हायकमांडने अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही. आता पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून प्रतिक्रिया दिली आहे. दिल्ली येथे काँग्रेसच्या नवीन कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी माध्यमांशी बोलत होते.



काँग्रेस कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी पत्रकारांनी पृथ्वीराज चव्हाणयांनी प्रदेशाध्यक्ष पदाबाबत प्रश्न विचारला असता, प्रदेशाध्यक्ष पदासाठी मी इच्छुक नाही. जी चर्चा सुरू आहे, ती मला माहित नाही, अशी प्रतिक्रिया दिली. या महिन्यात काँग्रेसला नवा प्रदेशाध्यक्ष मिळेल की नाही, हे मला माहीत नाही, असेही त्यांनी सांगितले. पक्षाच्या नवीन कार्यालयाबाबत बोलतात पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, आज नव्या काँग्रेस कार्यालयाचे उद्घाटन होत आहे, त्याचा आनंद आहे. अकबर रोडवरील कार्यालयाला मोठा इतिहास आहे.काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी तरुण नेत्यांची चाचपणी सुरू असल्याची चर्चा आहे. या पदासाठी विश्वजीत कदम, माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि माजी मंत्री अमित देशमुख यांची नावे चर्चेत आहेत. लवकरच याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. महिलांना संधी मिळाली तर चांगलंच आहे. पक्ष कोणाला संधी देतो बघू, असे म्हणत यशोमती ठाकूर यांनी प्रदेशाध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याचे संकेत दिले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी नेमकी कोणाची वर्णी लागणार, पक्षश्रेष्ठी कुणाची निवड करणार, ते पाहणे लागणार आहे.

## बीड हत्या प्रकरणानंतर अजितदादांचा मोठा निर्णय राष्ट्रवादीची संपूर्ण जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

**मुंबई (वृत्तसंस्था)**
बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड याचा संबंध असल्याने अनेक राजकीय आरोप - प्रत्यारोप होत आहेत. या हत्या प्रकरणानंतर आता राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी मोठा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस बीडची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. हा धनंजय मुंडे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.
संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आता ही मोठी घडामोड घडली आहे. या हत्याकांड प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याच्यामुळे राष्ट्रवादीची जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसची जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली. विष्णू चाटे हा केजचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा तालुकाध्यक्ष होता, मात्र या गुन्ह्यात त्याचे नाव आल्यानंतर त्याला तातडीने निलंबित केले होते. यानंतर आता संपूर्ण जिल्हा कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे.



संतोष देशमुख हत्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अनेक लोकांची चौकशी सुद्धा झाली, त्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर सुनील तटकरे यांनी हा निर्णय घेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बीड जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली. जिल्हाध्यक्ष आणि तालुका अध्यक्षांची निवड होईपर्यंत जिल्हाध्यक्ष म्हणून राजेश्वर चव्हाण हेच काम पाहतील असे पक्षाकडून कळवण्यात आले आहे. तसेच यापुढे तालुका अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्या चारित्र्याची पडताळणी करूनच नेमणुका कराव्या अशा सूचना प्रदेशाध्यक्षांकडून बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना देण्यात आल्या आहेत.संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर पक्षातील नेत्यांवर मोठ्या प्रमाणावर आरोप झाले होते, त्याचबरोबर मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर वाल्मिक कराडशी असलेला संबंध आणि इतर घडामोडींच्या पार्श्वभूमीनंतर आता पक्षाकडून मोठी खबरदारी घेतली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने घेतलेल्या निर्णयावरून आता गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किंवा कोणत्याही गुन्ह्याच्या घटनेत सहभागी झालेले लोक असतील त्यांना पदापासून दूर ठेवले जाईल, अशी मानसिकता पक्षाची दिसून येत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे.

# परळीत काय सुरू? मला फारशी माहिती नाही:तणावपूर्ण परिस्थितीबाबत गृहमंत्र्यांशी चर्चा करणार-पंकजा मुंडे

**मुंबई (वृत्तसंस्था)**
वाल्मीक कराडवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई झाल्यानंतर परळीमध्ये जोरदार राडा झाल्याचे पाहायला मिळाले. वाल्मीक कराड समर्थकांकडून काल परळी बंदची हाक देण्यात आली होती. दरम्यान, आजही परळीतील व्यापाऱ्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे. या घटनांवर आमदार पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली असून मला त्याबद्दल काही माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या. बीडमधील तणावाबाबत गृहमंत्र्यांशी चर्चा करणार, असेही त्यांनी सांगितले.
वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ मंगळवारी आणि आज परळी तालुक्यात आंदोलन करण्यात आले. अनेक ठिकाणी वाल्मीक कराडचे समर्थक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यामुळे परळीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. मात्र, यावेळी त्यांनी अधिक बोलणे टाळले.परळी सध्या बंद आहे, याबाबत पत्रकारांनी पंकजा मुंडे यांना विचारणा केली असता, सध्या परळीत काय सुरू आहे, याबाबत मला फारशी माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या. मी माझ्या नियोजित कार्यक्रमात आहे. रोज सकाळी उठून रात्रीपर्यंत काम करत आहे. या गोष्टी आता माझ्यासाठी आत्ता मॅटर करत नाहीत. माझ्यासाठी रोजचे काम मॅटर करते, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.परळीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून तणावपूर्ण वातावरण आहे, अशी विचारणा केली असता, तेथील तणाव करण्यासाठी मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. तणाव कमी करण्यासाठी गृहमंत्रालयाला काय करता येईल, ते करावे, असेही त्या म्हणाल्या.
दरम्यान, खंडणी प्रकरणातील आरोपी आणि धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराडच्या रिमांडवर आज बीड जिल्हा न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायालयाने वाल्मीक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली आहे. वाल्मीक कराडची सुनावणी पार पडल्यानंतर त्याला न्यायालयातून जेलकडे नेत असताना बीड न्यायालय परिसरात वाल्मीक कराड समर्थक आणि विरोधकांची एकमेकांसमोर घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांनी घोषणाबाजी करणाऱ्यांना ताब्यात घेतले. वाल्मीक कराडच्या मूळगावी पांगरी येथे काही तरुण मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन करत आहेत. वाल्मीक कराडवर राजकीय आणि जातीय द्वेषातून कारवाई केल्याचा आरोप समर्थकांकडून होत आहे. पांगरी गावातील पुरुष महिला एकत्रित येऊन वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ निदर्शने करत आहेत.



# पतंग खेळा पण सांभाळून...

**संक्रांत सणाच्या निमित्ताने पतंगबाजीचा खेळ सर्वत्र सुरू दिसतो. आकाशात उंचच उंच उडणाऱ्या रंगीबेरंगी पतंगा पाहून अनेकदा आनंद होतो. परंतु आपला हा आनंद कोणाच्या जीवावर उठणार नाही यासाठी पतंगबाजांनी थोडीशी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. विजयाच्या खोट्या आमिषाला बळी न पडता नायलॉन मांजाऐवजी साध्या धाग्याचा वापर करून पतंगबाजी करणे कधीही श्रेयस्कर होईल. आपल्या आनंदासोबतच आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या आणि रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या जिविताचे रक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे.**

नायलॉन धाग्याच्या वापरामुळे गळ्यात हा धागा लटकून अनेकदा नागरिकांना आणि पक्षांना जीव धोक्यामध्ये घालावा लागतो. गळ्याला लागणाऱ्या धाग्यामुळे होणाऱ्या घटनांवर प्रतिबंध करण्यासाठी या धाग्याच्या वापरावर बंदी आणणारा कायदा कठोरपणे अमलांत आला पाहिजे. त्यासोबतच समाजामध्ये जनजागृती झाली पाहिजे. कोणाच्या जीवावर संक्रांत येणार नाही यासाठी नायलॉन धाग्याचा वापर मी करणार नाही तसेच कोणी करताना आढळल्यास त्याला समजावून सांगेल अशी समाजाची मानसिकता तयार होणे आवश्यक आहे. धाग्यांची निर्मिती दोन प्रकारची असते. एक नैसर्गिकरित्या तयार होणारा धागा. आणि

दूसरा कृत्रिम पद्धतीने तयार केला जाणारा धागा. नैसर्गिक पद्धतीने तयार होणाऱ्या धाग्यामध्ये कापसापासून तयार होणाऱ्या धाग्याचा उल्लेख करता येईल. या धाग्यांचे आयुर्मान ठरलेले असते, ते कुजून कालांतराने आपोआप नष्ट होतात. पूर्वीच्या काळी पतंग उडविण्यासाठी याच कापसापासून तयार झालेल्या धाग्याचा वापर केला जायचा. परंतु अलीकडे मागील दशकात पतंगबाजी करणारी पिढी कृतीम धाग्याकडे वळलेली आहे. अर्थात अलीकडे पतंगबाजी करण्यासाठी नॉयलॉनच्या मांजाचा उपयोग मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे लक्षात येत आहे. हा धागा कुजत नाही आणि सहजासहजी तुटतही नाही. हा धागा तयार करण्यासाठी नायलॉनच्या खालोखाल पॉलीअमाईड, पॉलीक्रीलोणायट्राईल, पॉलीव्हिनील क्लोराईड, कोपॉलीमर, पॉलीप्रोपोलीन, पॉलीव्हिनील अल्कोहोल अशा रसायनांचा वापर होत असल्याची माहिती कळते.



काही प्रमाणामध्ये मच्छीमारीसाठी अशा प्रकारच्या धाग्याचा उपयोग होत असल्याची माहिती आहे.



पब्लिक टॅग
डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

औद्योगिकदृष्ट्या विचार करता अशा प्रकारच्या धाग्याची निर्मिती करणारे छोटे मोठे कारखाने अनेक ठिकाणी असावे असे वाटते. यांच्यावर कागदोपत्री बंदी घातलेली असली तरी प्रत्यक्षात ती किती प्रभावी असेल हे पुरवठा होणाऱ्या मांजाच्या प्रमाणावरून लक्षात येते. आपल्या देशामध्येच पद्धती अशी आहे की, अनेकदा कायद्याने अनेकदा मनाई असते. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा या भ्रष्टाचारी असल्याने व त्यात स्वार्थ आड येत असल्याने प्रत्यक्षात प्रामाणिक अंमलबजावणी होताना दिसत नाही. संक्रांतीच्या सणामध्ये अनेकांना पतंग उडवण्याची इच्छा होते. आपलीच पलंग विजेता ठरली पाहिजे असे वाटण्याच्या इर्षेतून नायलॉन मांजा वापरला जात आहे.

एखाद्या व्यक्तीजवळ माझा मिळाला की त्याला अटक करायची आणि तेवढ्यापुरता चौकशीचा फार्स उभा करायचा. सगळे हास्यास्पद आहे, खरोखरच जर ही समस्या मिटवायची असेल तर ज्या ठिकाणी हा धागा तयार होतो त्या कारखान्यावर बंदी आणायला पाहिजे. त्याचे उत्पादन कायमचेच कसे बंद करता येईल यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. तिथून माल विकणारे एजंट, विक्रेते आणि ग्राहक यांची एक वर्गवारी तयार करून हे रॅकेट मोडीत काढले पाहिजे. तसेच साठवणूक आणि विक्री करणा-यांविरुद्ध कठोर कारवाई झाली तर कदाचित ही माझ्याची समस्या निघून जाईल. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. पक्षांसोबतच आणखी धोक्यात येणारा घटक म्हणजे दुचाकी वाहन चालक. जेव्हा एखादा दुचाकीस्वार भरधाव वेगाने आपली गाडी चालवत जातो तेव्हा मांझा समोरून आल्यावर थेट त्याच्या गळ्यात जाऊन अडकतो आणि अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. त्याच्या परिवाराला पोरके व्हावे लागते. याची दखल कोण घेणार?

पतंग सर्वांत उंच कशी जाईल आणि पेच लावल्यावर कशी जिंकेल या आनंदासाठी धावपळ सुरू असते. यासाठी लहानथोर माणसे मोठ्या प्रमाणामध्ये सहभागी होताना आपल्याला दिसतात. मात्र माणसाच्या या आनंदामध्ये प्राणी, पक्ष्यांवर संक्रांत येते. हे आपल्याला या काळात रस्त्यावर फिरताना रस्त्यावर पडलेले पक्षी पाखरं बघून सहज लक्षात येईल. आकाशामध्ये निरपेक्ष फिरणाऱ्या पक्षांच्या विहारावर यामुळे बंदी येते. त्यांचे गळे कापले जातात व अनेक अवयव कापून दुर्घटनाग्रस्त होतात. या संदर्भामध्ये अनेक पक्षीमित्र वारंवार त्यांच्या पध्दतीने आवाज उचलतात तरी या मुक्या जीवांचे कोणालाही काही वाटत नाही.

जीविताचे रक्षण करणे आणि रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या गळ्याचे रक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे.केवळ आपल्या आनंदासाठी असा खेळ खेळण्यावर प्रशासनाने बंदी आणली पाहिजे. नैतिक कर्तव्य समजून समाजातील लोकांनीही त्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे, मात्र याबाबतीत ज्या प्रमाणामध्ये स्थानिक एनजीओंकडून या संदर्भात जनजागृती करायला पाहिजे ती अल्प आहे. त्यामुळे ज्या प्रमाणात मांझाचा वापर करायला पाहिजे ते थांबत नाही. साधारणतः किशोरवयीन मुले व महाविद्यालयीन मुले मोठ्या प्रमाणामध्ये पतंगबाजी करताना दिसतात. हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालया सारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडून आणली तर कदाचित विद्यार्थ्यांना दुष्परिणाम समजतील आणि विद्यार्थी जागृत माझाचा वापर करणार नाही. शालेय व महाविद्यालयस्तरावर ज्या यंत्रणा आहे त्यांनी या संबंधात विशेष व्याख्याने व जाणीव जागृती कार्यक्रम हाती घ्यायला पाहिजे. शाळा महाविद्यालयांना लक्ष करून जर अशाप्रकारे जनजागृती करण्यात आली तर कदाचित मांजाचा वापर निश्चितपणे घटेल असा विश्वास वाटतो. महाविद्यालयस्तरावर राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग यासारखे विद्यार्थ्याभिमुख उपक्रम असतात, या उपक्रमांच्या माध्यमातून घराघरात मांझाबंदीची भूमिका पोहोचवता येईल व आकाशात उडणाऱ्या जीवांचे मोठ्याप्रमाणात रक्षण करता येईल, पर्यावरणाच्या संरक्षणामध्ये पक्षांची भूमिका फार महत्वाची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. दुर्दैवाने आज या पक्षांच्या जीवावर संक्रांत येत आहे. पक्षांचा जीव वाचविणे हे आपल्या सगळ्यांचं आद्यकर्तव्ये आहे. त्याचप्रमाणे माझ्या नादानपणामुळे कुणाची मान कटणार नाही यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. स्वतः जगा आणि दुसऱ्यांनाही जगू द्या.

## लोणी काळभोर परिसरात गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांचा विळखा

**शिरूर । रमेश बनसोडे**

पुणे जिल्ह्यातील पूर्व हवेली तालुका सुसंस्कृत वारकरी परंपरा आणि समृद्ध बारमाही बागायतीसाठी ओळखला जातो. मात्र, लोणी काळभोर परिसरात अवैध धंद्यांनी घर केले आहे. अंमली पदार्थ, दारू विक्री आणि गांज्याचा व्यापार उघडपणे सुरू असून, शिक्षणासाठी आलेल्या तरुण पिढीला नशेच्या आहारी नेले जात आहे.

या भागातील कायदा व सुव्यवस्थेला हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. गटागटाने खुलेआम हाणामाऱ्या, नशेत बुडालेली तरुणाई, आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यामुळे पूर्व हवेली तालुक्यात सामाजिक स्थिती गंभीर बनली आहे. अल्पवयीन मुले गुन्हेगारीच्या वाटेवर चालू लागली आहेत, ज्यामुळे हा भाग संस्कृती आणि शांततेच्या बाबतीत मागे पडत आहे.



लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे खुलेआम चालू आहेत. पुणे पोलीस आयुक्तांनी अशा धंद्यांवर कारवाईचे आदेश दिले असले तरीही, हे धंदे जोमात सुरू आहेत. या प्रकारांना कोणाचे पाठबळ मिळत आहे, याचा शोध घेऊन कडक कारवाई करणे गरजेचे आहे. महामार्गांवरील पान टपऱ्यांतून नशेचे पदार्थ, जुगार अड्डे आणि अवैध दारू विक्रीने आपले बस्तान बसवले आहे. परिणामी, तरुण गुन्हेगारी मार्गाकडे वळत आहेत. या प्रकारांमुळे लोणी काळभोर परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या भागातील पोलीसांना संपर्क साधणे कठीण झाले आहे. फोन बंद असणे किंवा वेळेवर सेवा न मिळणे ही नेहमीची समस्या झाली आहे. परिणामी, स्थानिक रहिवाशांना या प्रकारांशी झुंजावे लागत आहे.

या भागातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कार्यक्षम पोलीस आयुक्तांनी तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी देखील या विषयाची दखल घेऊन प्रभावी कारवाईचे निर्देश देणे गरजेचे आहे.

या भागातील संस्कृती बिघडत चालल्याचे चित्र असून, यामुळे अल्पवयीन पिढीवर वाईट परिणाम होत आहे. कायदा व सुव्यवस्था पूर्ववत ठेवण्यासाठी तातडीने आणि प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.

## वैजापूर तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील कविटखेडा वळण शिवारात गट क्रमांक १३३ मधील गोरख काशिनाथ चव्हाण यांच्या शेतात बिबट्याने धुमाकूळ घातल्याची घटना घडली. मध्य प्रदेशातील कापूस वेचणाऱ्या कामगारांचा १० वर्षीय मुलगा महेश सिद्धार्थ आखाडे बिबट्याच्या हल्ल्याचा बळी ठरताना थोडक्यात बचावला.

घटनास्थळी महेश ज्वारीच्या शेताजवळ बसला असताना बिबट्याने अचानक हल्ला करून त्याला उचलून ज्वारीच्या शेतात नेलं. महेशच्या कुटुंबीयांनी व शेतकऱ्यांनी आरडाओरड केल्यावर बाजूच्या शेतात ट्रॅक्टर चालवणाऱ्या व्यक्तींनी सतर्क होऊन ट्रॅक्टर ज्वारीच्या शेतात फिरवलं. यामुळे बिबट्याने मुलाला सोडून पळ काढलं.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याला पकडावं, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या घटनेने शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून तातडीनं उपाययोजना न केल्यास पुढील संभाव्य धोका टाळता येणार नाही, असं



नागरिकांनी नमूद केलं आहे.

या घटनेनंतर वनविभागाने तत्काळ पाऊलं उचलून बिबट्याचा बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्यांसाठी संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

## आनंदनिकेतन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंदनिकेतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर दिनांक ७ ते १३ जानेवारी २०२५ या कालावधीत भद्रावती तालुक्यातील पारोधी येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. उद्घाटन समारंभ प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. उद्घाटन प्रसंगी महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाला गोंडवाना विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या डॉ. रंजना लाड आणि पारोधीतील ज्येष्ठ नागरिक दामोदर बोबडे उपस्थित होते.

या वर्षीच्या शिबिराची थीम होती मतदार जनजागृती, प्लास्टिक व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनासाठी युवाशक्ती. या थीमनुसार विविध बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्लास्टिक व्यवस्थापनावर अनुसया काळे व त्यांच्या टीमने मार्गदर्शन केले. सायबर क्राइम आणि मोबाईलच्या दुष्परिणामांवर मुजावर अली व रोशन इरपाते यांनी मार्गदर्शन केले. मतदार नोंदणी जनजागृतीबाबत डॉ. तक्षशिल सुटे यांनी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवरील व्याख्यान विजय तांबे यांनी दिले. शिबिराच्या सात दिवसांत विद्यार्थ्यांनी श्रमदान, स्वच्छता अभियान, प्लास्टिक गोळा करणे, रस्ते रुंदीकरण,





क्रीडांगण तयार करणे यांसारख्या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. 'श्रम ही श्रीराम हमारा' या ब्रीदवाक्यानुसार श्रमाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

रोज रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः विद्यार्थी आशिष माणूसमारे यांचे कीर्तन, भाऊ थुटे यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन, अण्णाभाऊ साठे कलामंचाचा लोकनाट्य कार्यक्रम, आणि 'स्वरानंदनवन' या ऑर्केस्ट्राने उपस्थितांची मनं जिंकली. पारोधी गावातील महिलांसाठी खेळांच्या स्पर्धा घेतल्या गेल्या, ज्याला महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. दररोज सकाळी होणाऱ्या दिंडीत गावातील भजन मंडळ व महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. समारोपीय समारंभात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. डॉ. रंजना लाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यासपीठ व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांवर फुले उधळून भावनिक निरोप दिला. प्राचार्य डॉ. मृणाल काळे, उपप्राचार्य राधा सवाने, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मोक्षदा नाईक, प्रा. सुरेश राठोड, आणि प्रा. मारुती मुंडे यांचे नियोजन तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादामुळे हे शिबिर यशस्वी झाले.

या शिबिरामुळे सामाजिक जनजागृती आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन मिळाले, असे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले.

## श्री.वरदविनायक धाम येथील सुशोभीकरणाचा लोकार्पण सोहळा संपन्न

**राहुरी । प्रतिनिधी**

श्री.वरदविनायक धाम येथील गणपती मंदिराचे सुमारे एक कोटी रुपयांतून करण्यात आलेल्या सुशोभीकरणाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. ह.भ.प.उध्दव महाराज मंडलीक यांच्या मार्गदर्शनाखाली या धार्मिक केंद्राची तपपूर्ती होत असून,अध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या एक महत्वपूर्ण केंद्र झाले आहे.या कार्यक्रमास आमदार राधाकृष्ण विखे जलसंधारण मंत्री महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते त्यांनी श्री.वरद विनायक धाम सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

या प्रसंगी माजी मंत्री मा.आण्णासाहेब म्हस्के





पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनी विखे पाटील, कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे, नंदूशेठ राठी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



पिशोर (जावेद शेख)-संक्रांती नंतर दुसरा दिवस म्हणजे कर....कन्नड तालुक्यातील पिशोर येथील प्रसिद्ध असलेले सलमान कुरेशी यांचे ९ीरी मटण अँड चिकन शॉप मध्ये मटन व चिकन घेण्यासाठी झालेली ही खवय्यांची तुफान गर्दी

# ग्रामविकास मंत्र्यांद्वारे ‘झेडपी’ च्या प्रकरणात चौकशीचे आदेश

## भाजपाद्वारे तक्रार दाखल:कठोर कारवाई व्हावी,अशी मागणी

**परभणी | लक्ष्मण उजगरे**

अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास योजनेंतर्गत विद्युतीकरणासह पेवर ब्लॉक व रस्त्याची कामे पूर्ण झाल्याचा दावा करीत जिल्हा परिषदेंतर्गत बांधकाम विभागातील शाखा अभियंता, उपअभियंता व कार्यकारी अभियंत्यांच्या भ्रष्ट साखळीने कोट्यवधी रुपयांच्या निधीवर खुलेआमपणे दरोडा टाकण्याचा पध्दतशीरपणे केलेल्या अयशस्वी प्रयत्नांच्या प्रकरणात राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश बजावले आहेत.भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी जिल्हा परिषदेंतर्गत बांधकाम विभागाच्या या योजनेतील या अभूतपूर्व गैरप्रकाराबाबत ग्रामविकास मंत्री गोरे यांच्याशी संपर्क साधून तपशीलवार माहिती निदर्शनास आणून दिली. त्याचवेळी मंत्री गोरे यांनी या प्रकरणात आपण संबंधित यंत्रणेमार्फत माहिती मागविली आहे, तसेच उच्चस्तरीय चौकशीचे आदेशही बजावले आहेत, असे नमूद केले.दरम्यान, परभणी जिल्हा परिषद व परभणी पंचायत समितीद्वारे अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास योजनेतून परभणी तालुक्यातील पेडगावात प्रभाग क्रमांक ३ या अल्पसंख्यांक वस्तीमध्ये शादीखाना परिसरात पेव्हर ब्लॉक बसविण्याकरीता २५ लाख रुपये, तेथीलच विद्युतीकरणाच्या कामाकरीता २० लाख रुपये, शेख रीयाज ते शेख सिराज यांच्या घरापर्यंत विद्युतीकरणाकरीता १५ लाख, शेख मनसुर ते करीम पठाण यांच्या घरापर्यंत पेवर ब्लॉक बसविण्याकरीता १० लाख तसेच जामा मस्जिद ते शेख मुसा शेख खलील यांच्या घरापर्यंत विद्युतीकरणाकरीता १० लाख, प्रभाग क्रमांक ३ मधील वस्तीत विद्युतीकरणाच्या नावाखाली २० लाख व याच अल्पसंख्यांक वस्तीत सीसी रस्त्याच्या कामाकरीता २० लाख व पेव्हर ब्लॉकच्या कामाकरीता २० लाख एवढा मोठा निधी मंजूर केला. या व्यतिरिक्त परभणी तालुक्यातील किन्होळा खु. येथील अल्पसंख्यांक वस्तीत विद्युतीकरणाकरीता १५ लाख व पेव्हर ब्लॉक बसविण्याकरीता १५ लाख, तसेच पाथरा या गावी अल्पसंख्यांक वस्तीत पेव्हर ब्लॉक करीता २० लाख व विद्युतीकरणाकरीता २५ लाख एवढा निधी मंजूर केला. या एकूण १२ कामांकरीता २ कोटी १५ लाख रुपये निधी पंचायत समिती व जिल्हा परिषदेने मंजूर केला.




त्याप्रमाणे या ग्रामपंचायतीत संबंधित वार्डात या योजनेतून संबंधित कामेसुध्दा पूर्ण झाल्याचा दावा करीत परभणी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी तथा प्रशासक दिपा बापट यांनी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अभियंता पंचायत यांच्याकडे २ जानेवारी २०२४ रोजी एका पत्राद्वारे पेडगावातील ३ व किन्होळा येथील २ कामांपोटी ९० लाख रुपयांचा निधी वितरित करावा, अशी मागणी केली. संबंधित कामांचे मूल्यांकन शाखा अभियंता यांनी केले असून त्यास या कामांचा पूर्णत्वाचा दाखला उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दिलेला आहे, असेही नमूद केले. निधी वितरीत करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करतेवेळी कामाची मोजमाप पुस्तिका व संचिका काम पूर्णत्व प्रमाणपत्रासह प्रस्तावासोबत सादर करत आहोत, सदरील कामे पूर्ण झालेली असून नियमाप्रमाणे सर्व कपाती घेतल्या आहेत, असे स्पष्टपणे नमूद केले होते. याच दिवशी याच गटविकास अधिकार्यांनी पेडगावातील ५ व पाथरा येथील २ अशा एकूण सात कामांचाही निधी वितरीत करावा, असा प्रस्ताव उपमुख्य कार्यकारी अभियंता पंचायत यांना सादर केला. त्यातून १ कोटी २५ लाख रुपयांच्या निधीची मागणी केली. त्यातही या कामांचे मूल्यांकण शाखा अभियंता यांनी केले असून कामाचा पूर्णत्वाचा दाखला उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दिला आहे, हे स्पष्ट केले. प्रस्तावासोबत कामाची मोजमाप पुस्तिका व संचिका काम पूर्णत्व प्रमाणपत्रासह प्रस्तावासोबत सादर केला व सदरील कामे पूर्ण झालेली असून नियमाप्रमाणे सर्व कपाती घेतल्या आहेत, हेसुध्दा या पत्राद्वारे गटविकास अधिकारी बापट यांनी नमूद केले.या दोन्ही पत्राद्वारे एकूण १२ कामांकरीता २ कोटी १५ लाख रुपयांचा निधी वितरित करावा, हे स्पष्टपणे सूचविल्या गेले होते. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभागाकडून या संदर्भात पुढील कारवाई अपेक्षित होती. या पार्श्वभूमीवर पेडगाव येथील युवा नेते संतोष देशमुख यांच्या नेतृत्वाखालील ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच तसेच अन्य सदस्यांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हा प्रशासनास निवेदन सादर करीत या गैरप्रकाराबाबतच्या सर्व बाबी कागदपत्रांसह जिल्हाधिकार्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकार्यांनाही या बाबतची कल्पना दिली. त्यामुळे या प्रकरणातील गौडबंगाल बाहेर पडले.

# उमरखेड पोलीस ठाणे स्तरावरील क्रीडा स्पर्धांची उत्साहात सांगता



**उमरखेड | प्रतिनिधी**

उमरखेड येथे यवतमाळ जिल्हा क्रीडा महोत्सव अंतर्गत पोलीस ठाणे स्तरावर कबड्डी, व्हॉलीबॉल आणि क्रिकेट या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा ९ ते १४ जानेवारी दरम्यान जिल्हा परिषद मैदानात पार पडल्या.

कबड्डीत यवतमाळ स्टोअर फाउंडेशन कबड्डी संघ, दराटी यांनी विजेतेपद पटकावले, तर उपविजेता श्री सेवादास कबड्डी संघ, चिल्ली ठरला. व्हॉलीबॉलमध्ये न्यू स्टार व्हॉलीबॉल संघ, उमरखेड विजेता आणि उपविजेता ठरला. क्रिकेटमध्ये कुणाल क्रिकेट क्लब, उमरखेड आणि ग्रीन स्टार क्रिकेट क्लब, उमरखेड यांनी अनुक्रमे विजेता व उपविजेता संघ म्हणून कामगिरी केली.

स्पर्धेच्या सांगतेवेळी विजेत्या व उपविजेत्या संघांना प्रोत्साहनार्थ बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून आयोजित या स्पर्धांमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील क्रीडाप्रेमींना व्यासपीठ मिळाले. यामुळे पोलीस आणि जनतेतील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी




**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी २२ जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणूक, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही.

# महाड एमआयडीसी पोलिसांकडून आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश: सात आरोपी अटकेत

**महाड | प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वाकी येथील बीएसएनएल टेलिफोन एक्सचेंज टॉवरवरील चाळीस हजार रुपये किंमतीच्या २४ बॅटऱ्या चोरी प्रकरणाचा महाड एमआयडीसी पोलिसांनी काही तासांत छडा लावत आंतरराज्य टोळीला अटक केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

चोरीची तक्रार: बीएसएनएलचे ज्युनिअर इंजिनिअर तुषार चौधरी यांनी मंगळवारी, १४ जानेवारी रोजी महाड एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तींनी टॉवरवरील २४ बॅटऱ्या चोरल्या होत्या.

:सचिन काशीराम तुपट (४५), राहणार शिरगाव, महाड, प्रदीप दशरथ गिरी (४७), राहणार दादली, महाड, प्रसाद चरणदास पाटील (४६), राहणार दासगाव, महाड, संकेत वासुदेव पाटील (३४), सध्या राहणार दादली, मूळगाव देहेन, अलिबाग, इमरान सलीम मलिक (३१), सध्या राहणार पोलादपूर, मूळगाव मेरठ, उत्तर प्रदेश, योगेश धर्मेंद्र दौंड (२२), राहणार आदर्श नगर, महाड, नईम सलीम मलिक (२५), सध्या राहणार पोलादपूर, मूळगाव बवाना, दिल्ली असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नावे आहेत.



आरोपींमध्ये बीएसएनएलच्या चार कर्मचाऱ्यांचा समावेश असून, त्यांनी बाहेरील तीन साथीदारांसोबत चोरीचा कट रचला होता. चोरीच्या बॅटऱ्या स्क्रॅप म्हणून विकण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार पवार या प्रकरणाचा तपास करत आहेत. महाड एमआयडीसी पोलिसांनी वेळेवर कारवाई करत टोळीचा पर्दाफाश केल्यामुळे स्थानिक नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, अन्य तपशील लवकरच उघड होण्याची शक्यता आहे.

# घुसखोर बांगलादेशींविरोधात पोलिसांची मोहिम; नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**महाड | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांविरोधात महाड एमआयडीसी पोलिसांनी धडक मोहिम राबवली असून, यामध्ये सहा बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. औद्योगिक क्षेत्रातील कंपनी मालक, व्यापारी आणि स्थानिक नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी केले आहे..




एमआयडीसी परिसरातील घुसखोर शोध मोहिमेच्या अनुषंगाने, सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी याआधीच औद्योगिक कंपन्या व व्यापाऱ्यांना पत्रव्यवहार करून कंत्राटी कामगारांची पडताळणी करून संबंधित कागदपत्रे पोलीस प्रशासनाला देण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच बाहेरून आलेल्या अनोळखी व्यक्तींना घर भाड्याने देताना रीतसर भाडेकरार तयार करून त्याची नोंद पोलिसांकडे करावी, असेही सांगण्यात आले होते.

सुरक्षा विषयक या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी नागरिक व कंपन्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे निरीक्षण माने यांनी नोंदवले आहे. आतापर्यंतच्या पत्रव्यवहारास अल्प प्रतिसाद मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेशी निगडित आहे. त्यामुळे प्रत्येक देशभक्त नागरिकाने या मोहिमेत सहकार्य करणे आवश्यक आहे, असे माने यांनी सांगितले.

परिसरात अजूनही काही बांगलादेशी घुसखोर अवैधरित्या वास्तव्य करत असल्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांनी सतर्क राहून पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक ती माहिती पोलीस प्रशासनाला पुरवावी, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी नागरिकांनी तत्काळ स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधून आवश्यक माहिती द्यावी, असेही पोलिसांकडून कळविण्यात आले आहे.

# बिरवाडी-खरवली येथून ४७ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता

**महाड | प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी-खरवली येथून ४७ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता झाल्याची तक्रार महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.



बेपत्ता झालेल्या महिलेचे नाव अनिता दिनकर कदम आहे. त्या यळकोट चाळ, खरवली येथे राहत होत्या आणि मूळ रा. सुपे, तालुका बारामती, जिल्हा पुणे आहेत.

अनिता कदम यांच्या पती दिनकर गोविंद कदम यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दिनकर कदम यांच्या माहितीनुसार, त्यांच्या पत्नी अनिता कदम यांना पंधरा वर्षांपूर्वी डोक्याला गंभीर परिणाम झाला होता, ज्यामुळे त्यांनी घरातील कोणालाही काही न सांगता घर सोडले.

दिनकर कदम यांनी आपल्या नातेवाईकांकडे शोध घेतला, परंतु अनिता कदम या कोठेही सापडल्या नाहीत. त्यानंतर, दिनकर कदम यांनी पोलीस ठाणे गाठून पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली.

बेपत्ता अनिता कदम यांचा वर्णन असा आहे - ते अंगाने जाड, उंची ५ फूट ४ इंच, केस पिकलेले आणि लांब आहेत. त्यांनी अंगात साडी व ब्लाऊज परिधान केला आहे आणि गळयात सोन्याचे मंगळसूत्र आहे. तसेच, अनिता कदम मराठी भाषा बोलतात.

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक इक्कल शेख या संपूर्ण बेपत्ता प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# संगमनेरात अखेर अतिक्रमणांवर जेसीबी

**संगमनेर | प्रतिनिधी**

शहरातील रस्ता रुंदीकरणासाठी अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटाव मोहीमेला मंगळवारी सकाळी सुरुवात झाली. यामुळे नागरिकांनी स्वतःहून काही अतिक्रमणे काढून घेतली. संगमनेर नगर परिषद, पोलिस प्रशासन यांनी संयुक्तपणे ही मोहीम राबवली.

तीन बत्ती चौक ते जोर्वे नाका परिसराने मोकळा श्वास घेतला. बसस्थानक ते गवंडी पुरा मस्जिद ही अतिक्रमणेही काढली जाणार असून यासाठी ही धडक मोहिम तीन दिवस राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी दिली.

संगमनेर शहराबाहेरून जाणार्या नाशिक-पुणे महामार्गाचे काम पूर्ण होऊन रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला. आता शहरातील वाहतूक विस्कळीत न होता मुक्तपणे वाहन चालवणे शक्य होईल.मात्र अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद झाला. शहरातील वाहतूक सुरळीत सुटसुटीत व्हावी, यासाठी अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज ते



रायतेवाडी फाटा जोर्वे नाका प्रवरा नदी या शहरा अंतर्गत असणार्या महामार्गाच्या रुंदीकरणाचा निर्णय घेतला. माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी या कामी पुढाकार घेऊन हे काम मार्गी लावले. तांत्रिक अडचणीमुळे अमृतवाहिनी कॉलेज ते बसस्थानक या मार्गाचे काम पूर्ण करण्यात आले. तर मागील महिन्यात रायतेवडी फाटा ते संगमनेर खुर्द प्रवरा नदी या मार्गाचे रस्ता रुंदीकरणाचे कामही पूर्ण झाले. यामुळे सर्वच नागरिकांनी आता संगमनेर बसस्थानक ते जोर्वे नाका प्रवरा नदी या परिसरातील अतिक्रमणे कधी काढणार, याकडे संगमनेर शहर व तालुक्याचे लक्ष लागून होते.

अनेक राजकीय पक्षाच्या नेत्यांनी या कामी पुढाकार घेतला. मात्र मतांचे राजकारणाचा विषय आल्याने हे काम करण्यास अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. वाहतुकीची समस्या सुटत नसल्याने नागरिकांचा वाढता रोष लक्षात घेता. आमदार खताळ यांनी या रस्त्यावरील अतिरिकणे काढण्यासाठी अधिकार्यांची बैठक बोलावून कडक सूचना दिल्या. संगमनेर नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने १५ दिवसापूर्वी अतिक्रमण धारकांना नोटीसा बजावून स्वतःहून अतिक्रमण काढण्यास सांगितले होते. मात्र नेहमीप्रमाणे हे अतिक्रमण काढले जाणार नाही, अशी शक्यता वर्तवली जात होती. संगमनेर नगर पालिकेने शहर पोलिसांकडे मोठा पोलिस बंदोबस्ताची मागणी केली होती. अखेर मकर संक्रातीच्या दिवशी मंगळवारी (दि१४) सकाळीच मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला.

नगरपरिषदेने तीन बत्ती चौक ते जोर्वे नाका प्रवरा नदी महामार्गावरील सर्व अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली. बंदोबस्त व नगरपरिषदची तयारी पाहून अनेक नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली. काल दिवसभर ही अतिक्रमण हटाव मोहीम सुरू होती. यामुळे तीन बत्ती, जोर्वे नाका परिसरातील अतिक्रमणे हटवल्याने परिसराने मोकळा श्वास घेतला.

तीन दिवस मोहीम चालणार

ही मोहीम तीन दिवस राबविण्यात येणार आहे. बसस्थानक ते गवंडीपुरा मस्जिद सर्वाधिक अतिक्रमाने असलेला महामार्गावर मोठी पक्की बांधकामे आहे. ती काढण्यासाठी मोठ्या यंत्रसामुग्रीची गरज आहे. गेल्या अनेक वर्षापासुनची संगमनेरकरांची मागणी आता पूर्ण होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. शहरातील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रस्ता रुंदीकरणाबरोबरच अतिक्रमणे हटविणे गरजेचे होते. फेरी वाल्यांवर देखील कारवाई करणे गरजेचे आहे. फुटपाथवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमने झाले असून ती काढावी लागणार आहे.

रामदास कोकरे, मुख्याधिकारी संगमनेर संगमनेर नगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण मोहिम राबविली जात आहे. अगोदरच नोटीसा बजावण्यात आल्या आहे. यामुळे नागरिकांनी स्वतःहून काही अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली आहे. अद्यापही बरीच अतिक्रमणे काढण्याचे काम सुरु आहे. शहरातील रस्ता रुंदी करणासाठी अडथळा ठरणारी सर्वच अतिक्रमणे काढली जाणार आहे.

## आगामी निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करा

# म्हसा मध्ये महायुतीच्या स्नेह मेळाव्यात महायुतीच्या नेत्यांची एकमुखी घोषणा

**प्रफुल्ल शेवाळे । कल्याण**

राज्य विधानसभा २०२४ निवडणुका पार पडल्यानंतर प्रथमच महायुतीचा स्नेह मेळावा ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथील म्हसा गावी पार पडला. या मेळाव्यात भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांसह तालुक्यातील नेते, विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पौष महिन्यानंतर मुरबाडमध्ये म्हसा येथे खांब लिंगेश्वर, म्हणजेच म्हसोबा देवतेची जत्रा भरते. ठाणे जिल्हा, रायगड आणि पुणे या भागातून अनेक भक्त म्हसोबा देवाचं दर्शन घेण्यासाठी मुरबाडमध्ये येतात. याच जत्रेचं औचित्य साधून महायुतीच्या पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्त्यांसाठी स्नेह मेळावा आणि स्नेह भोजन आयोजित करण्यात आले होते.



दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांच्या पुढाकाराने कार्यकर्त्यांसाठी स्नेह भोजन आयोजित केले जाते. मात्र यंदा महायुतीच्या तीनही पक्षांच्या आणि रिपाईच्या कार्यकर्त्यांसाठी स्नेह मेळावा आणि स्नेह भोजन आयोजित करण्यात आले होते.

स्नेह मेळाव्यात प्रमुख नेत्यांची भाषणे झाली. यामध्ये भाजपचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकी, मुरबाडचे विद्यमान आमदार किसन कथोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, राष्ट्रवादीचे राज्य प्रवक्ते आनंद परांजपे, शिवसेना उपनेते प्रकाश पाटील यांसारख्या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

महायुतीच्या नेत्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, नेत्यांच्या निवडणुका झाल्या आहेत, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. आम्हाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला यश मिळवून द्यायचे आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी आहे. संपूर्ण महाराष्ट्र आता अनोख्या विकासाची दिशा घेईल. म्हणून गल्लीतून दिल्लीपर्यंत महायुतीचं वर्चस्व असावं. कार्यकर्त्यांनी रुसवे-फुगवे न ठेवता एकदिलाने स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या महायुतीच्या ताब्यात घ्या, अशी एकमुखी घोषणाही केली.

स्नेह मेळाव्यात माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, मुरबाडचे आमदार किसन कथोरे, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकी, शहापूर विधानसभा संघटक अशोक इरनाक, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, राष्ट्रवादी काँग्रेस राज्य प्रवक्ते आनंद परांजपे, ठाणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे चिटणीस डी. के. विशे सर, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळी, ठाणे जिल्हा ग्रामीण युवक अध्यक्ष प्रतीक हिंदुराव, ठाणे महापालिका नगरसेवक नजीब मुल्ला, कल्याण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, ठाणे जिल्हा प्रवक्ते मुकेश दामोद्रे, ठाणे ग्रामीण महिला जिल्हा अध्यक्ष कल्पना तारमळे, शिवसेना उपनेते प्रकाश पाटील, जिल्हा अध्यक्ष मारुती धिरडे, शहापूर तालुका प्रमुख प्रकाश वेखंडे आणि महायुतीचे विविध सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य क्रीडा दिन उत्साहात साजरा खेळाडूंना प्रेरणा आणि सन्मान

**भंडारा । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, भंडारा व विविध क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने ऑलिंपिकवीर स्व. खाशाबा जाधव यांच्या जन्मदिनानिमित्त राज्य क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा क्रीडा संकुल, भंडारा येथे आयोजित या कार्यक्रमात क्रीडा रॅली, कुस्ती स्पर्धा आणि मॅराथॉन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. समारोप सत्रात जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडू, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त क्रीडापटू आणि विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी यांना सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह आणि स्व. खाशाबा जाधव यांच्या जीवनचरित्रावर आधारित पुस्तक प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ, पोलीस निरीक्षक निलेश गीरी, जिल्हा क्रीडा अधिकारी लतिका लेकुरवाळे तसेच शिवछत्रपती पुरस्कारार्थी उपस्थित होते.




डॉ.कोलते यांनी स्व. खाशाबा जाधव यांच्या कार्याचा गौरव करत खेळाडूंना मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी अथक परिश्रम, सातत्य आणि योग्य दिशेने प्रयत्न महत्त्वाचे आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी लतिका लेकुरवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. निखिलेश तभाने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मोहरील यांनी केले, तर आभार प्रदर्शन अभय महल्ले यांनी केले. राज्य क्रीडा दिनाच्या निमित्ताने भंडारा जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा व नव्या पिढीला क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला

# यंदाचे वर्ष होणार 'एकनाथ हिरक आरोग्य वर्ष' म्हणुन साजरे-मंगेश चिवटे

**कोल्हार । प्रतिनिधी**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानत गरजू रूग्णांच्या आरोग्यसेवेसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातुन कायमच मदत केली जाते तसेच शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचा 'आरोग्य' हा जिव्हाळयाचा विषय असल्यामुळेच उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या ६० व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षातर्फे यंदाचे वर्ष 'एकनाथ हिरक आरोग्य वर्ष' म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना वैद्यकीय कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली.




नवर्षाच्या प्रारंभी या उपक्रमाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे हस्ते करण्यात आला असुन

याउपक्रमाअंतर्गत राज्यभरात विविध आरोग्यविषयक उपक्रम राबिवले जाणार असुन ज्युपिटर हॉस्पिटल, ठाणे येथे ६०० लहान मुलांच्या मोफत हृदय शस्त्रक्रिया,आनंद आश्रम येथे ६०० दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप,संपुर्ण राज्यात ६० भव्य महाआरोग्य शिबिरांचे आयोजन ,६० हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी,६० हजार नागरिकांना मोफत चष्मे वाटप,६० हजार नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया,६० हजार वृक्षांची लागवड व ६० हजार किलोमीटरची आरोग्य संवाद यात्रा संपूर्ण महाराष्ट्रातून काढण्यात येणार असुन या यात्रेच्या माध्यमातुन आरोग्यविषयक जनजागृती व शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार आहे.अशी माहिती दैनिक सह्याद्रीचा राखणदार या वृत्तपत्राचे वार्ताहार गणेश सोमवंशी यांनी यावेळी दिली.

# तांदूळ भरलेल्या ट्रकने कबाडीच्या उभ्या ट्रकला दिली धडक

## ट्रक ड्रायव्हर गंभीर जखमी, मटन सेंटरवरील कामगाराचा मृत्यू

**तळोधी (बा)। शिवाजी चौकातील घटना**

नागपूरवरून तांदूळ भरलेल्या ट्रकने उभ्या असलेल्या कबाडी ट्रकला जोरदार धडक दिल्याने ट्रक ड्रायव्हर गंभीर जखमी झाला, तर मटन सेंटरवरील एक कामगार उपचारादरम्यान मृत्यूमुखी पडला. ही घटना बुधवारी सकाळी ६:१० वाजता नागपूर-चंद्रपूर महामार्गावरील नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.) शिवाजी चौकाजवळ घडली.

तांदूळ भरलेला ट्रक नागपूरवरून मूल येथील दिशेने जात होता. दरम्यान, तळोधी (बा.) येथील कबाडी सामान भरलेला ट्रक उभा होता, त्यामागे एक रिकामा ट्रक देखील होता. भरधाव वेगाने आलेल्या तांदूळ भरलेल्या ट्रकने कबाडी ट्रकला जोरदार धडक दिली, ज्यामुळे तांदूळ भरलेले २५० कट्टे अस्ताव्यस्त झाले. धडक इतकी तीव्र होती की, उभे असलेले ट्रक ५० मीटरपर्यंत मागे सरकले. या धडकेनंतर रोडच्या कडेला असलेल्या किशोर कटारे यांच्या मटन सेंटरवर काम करत असलेल्या माधव नामदेव मांढरे (वय ३५) यांना ट्रकची धडक बसली, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. जखमींना तत्काळ चंद्रपूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान माधव मांढरे यांचे निधन झाले.

सदर घटनेबाबत तांदूळ भरलेल्या ट्रक ड्रायव्हर रामेश्वर चेकचंद बालाघाट ठाकरे याच्या विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास तळोधी (बा.) पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर, अंमलदार हंसराज सिडाम, राहुल चिमुरकर, स्वप्नील चांदेकर, महिला अंमलदार वैष्णवी लेनगुरे, संगीता कोसनवार हे करीत आहेत.



# २३ जानेवारीपासून लायन्स क्लब अलिबाग महोत्सवाची सुरुवात

**रायगड । ज्ञानेश्वर वाणी**

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने येत्या २३ ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान अलिबाग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव पाच दिवस सुरू राहणार असून यामध्ये विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. नवीन उद्योजकांना व्यवसायाच्या संधी मिळाव्यात, यासाठी २०० पेक्षा जास्त स्टॉल्स या महोत्सवात उपलब्ध करून दिले जातील, अशी माहिती फेस्टिवल कमिटीचे अध्यक्ष लायन नयन कवळे यांनी दिली.

प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात हा महोत्सव आयोजित केला जातो. यंदा अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावरील रिकाम्या जागेवर महोत्सवाची तयारी केली जात आहे. पार्किंगसाठी आजूबाजूच्या परिसरात सोय केली जाईल.

पाच दिवसीय महोत्सवात दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. इंडियन आयडॉल स्पर्धेत गाजवलेले गायक या ठिकाणी आपले कार्यक्रम सादर करणार आहेत. तसेच, कराओके गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, अलिबाग टॅलेंट स्पर्धा, फॅशन शो, पेट शो, आणि विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश करण्यात येणार आहे. नवउद्योजकांना प्रोत्साहन मिळवण्यासाठी २०० पेक्षा जास्त स्टॉल्स उभारले जातील. या स्टॉल्समध्ये खाद्यपदार्थ, विविध वस्त्रसामग्री, डिझाईनचे कपडे, बँका, विमा कंपन्यांची माहिती यांचा समावेश असेल. यासाठी मीनल मोहाडीकर यांच्या शॉपीचे सहकार्य मिळणार आहे.

सर्व नागरिकांना या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी लायन्स क्लब ऑफ अलिबागचे अनिल म्हात्रे, प्रवीण सरनाईक, प्रदीप नाईक, संजय पाटील, परेश भातेजा, अविनाश राऊळ, महेंद्र पाटील, संतोष पाटील, रणजीत जैन, रोहन पाटील यांसह अन्य सदस्य उपस्थित होते.

# बारावीच्या मुलांसाठी यावर्षी हॉल तिकीट ऑनलाइन उपलब्ध;शिक्षण मंडळाचा निर्णय

## माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातून हॉल तिकीट उपलब्ध करण्याचे निर्देश

**भंडारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळ पुणे यांच्याशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉल तिकीट ऑनलाइन उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश मंडळाने दिले आहे.

शाळेत हॉल तिकीट डाउनलोड करून त्यावर शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी देण्यात यावी अशी सूचना करण्यात आली आहे . हॉल तिकीट अर्थात प्रवेश पत्र उपलब्ध करून देताना विद्यार्थ्यांकडून कोणतीही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेश पत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक प्राचार्य यांचा शिक्का उमटून स्वाक्षरी करावी, अशी सूचना करण्यात आली आहे.

हॉल तिकीट संदर्भातील सर्व सूचना मुख्याध्यापक प्राचार्य यांना करण्यात आल्या असून यासंदर्भात कोणतीही अडचण असल्यास शाळेतून दूर करण्याबाबत मंडळांनी स्पष्ट केले आहे . हॉल तिकीट मध्ये काही दुरुस्ती हवी असल्यास ती देखील करण्याची व्यवस्था ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली आहे. ऐनवेळी प्रवेश पत्र गहाळ झाल्यास डुप्लिकेट प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना उपलब्ध करता येणार आहे. १० जानेवारी पासून प्रवेश पत्र लिंक द्वारे डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

मोठ्या महानगरामध्ये विद्यार्थ्यांनी पालकांनी परीक्षेच्या एक दिवस आधीच आपल्या सेंटरची माहिती करून घ्यावी. त्यामुळे दुसऱ्या दिवशी धावपळ होणार नाही. तसेच परीक्षेच्या दिवशी घरून निघणे ते सेंटर पोहोचणे याचे योग्य नियोजन करावे. किमान तासभर आधी सेंटरवर पोहोचण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे आवाहन

**भंडारा । प्रतिनिधी**

मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येतो.

त्यानुसार मराठी भाषा विभागाने यावर्षी मराठी भाषेसंदर्भात विविध कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात आयोजित करण्यासाठी सूचना दिल्या आहेत. शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तसेच त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारितील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा करणे अनिवार्य आहे.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाने दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करण्याबाबत सर्व कार्यालयांना निर्देशित केले आहे. या निर्देशानुसार कार्यक्रमांचे आयोजन करावे. राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारितील सर्व कार्यालये / सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. या पंधरवडयात केलेल्या कार्यक्रमांचे अहवाल शासनास व जिल्हाधिकारी कार्यालयास अवगत करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी, भंडारा यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले आहेत.

# भंडारा जिल्ह्यात 'मिशन १०० डे'ची अंमलबजावणी सुरू

**भंडारा । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'मिशन १०० डे' या ७ कलमी कार्यक्रमाची भंडारा जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी जिल्ह्यातील सर्व विभागांना या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निर्देश दिले आहेत.

या उपक्रमात नागरिकांसाठी सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा आणि गुंतवणूक प्रोत्साहन यावर भर दिला जाणार आहे. जिल्ह्यातील वेबसाईट अद्यावत करणे, इज ऑफ लिविंग वाढवणे, कार्यालयीन स्वच्छता, तक्रार निवारण, नागरी सुविधा सुधारणा, गुंतवणूक प्रोत्साहन, आणि क्षेत्रीय भेटी वाढविणे हे सात महत्त्वाचे मुद्दे या कार्यक्रमात समाविष्ट आहेत. १५ एप्रिलपर्यंत हा कार्यक्रम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, ५० दिवसांनंतर प्रगतीचा आढावा घेतला जाईल. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या सेवेसाठी ठोस पावले उचलण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# शहापूरच्या अदितीचं नवी मुंबईत छायाचित्र प्रदर्शन

**शहापूर तालुका हा नैसर्गिक साधनसंपत्तीचा खजिना आहे. निसर्गाची अनेक रूपं वेगवेगळ्या ऋतूंमध्ये पाहायला मिळतात. हे सौंदर्य लहानपणापासून मला भुरळ घालत होतं. त्याच सौंदर्याला मी कॅमेऱ्यात टिपण्याचा प्रयत्न केला आहे, असं अदिती सांगते. ग्रामीण भागातून शहरात येऊन शिक्षण घेत असताना आपली कला जोपासणाऱ्या अदितीचं यश इतरांसाठी प्रेरणादायी आहे.**




**ठाणे । रविंद्र धारवणे**

निसर्गसौंदर्याने नटलेला शहापूर तालुका गुणवंत व्यक्तींना जन्म देणारा मानला जातो. विविध क्षेत्रांत नावाजलेल्या व्यक्तींमध्ये आता छायाचित्रकारांचीही भर पडत आहे. शहापूरच्या भूमिकन्या अदिती सचिन चवाथे हिने आपल्या छायाचित्र कलेच्या जोरावर तालुक्याचं नाव उज्ज्वल केलं आहे.

अदिती सध्या नवी मुंबई येथील लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरमध्ये शेवटच्या वर्षाला शिकत आहे. लवकरच ती वास्तुविशारद पदवी मिळवेल. शिक्षण घेत असतानाच तिने आपल्या छायाचित्र कलेला प्राधान्य दिलं आहे. शहापूरच्या निसर्गसौंदर्याला आपल्या कॅमेऱ्यात टिपत तिने अनेक अप्रतिम छायाचित्रं साकारली आहेत. अदितीच्या छायाचित्रांत माहुली किल्ला, पानं-फुलं, विहिरी, भात शेतीसारखी ग्रामीण दृश्यं आहेत. शहरी जीवनाचं प्रतिबिंब दाखवणारी सीएसटी स्टेशन, ताज हॉटेल, मरीन ड्राइव्ह यांसारखी ठिकाणंही तिच्या छायाचित्रांतून खुलली आहेत. अदितीच्या या छायाचित्रांचे प्रदर्शन नवी मुंबईतील लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर येथे १३ जानेवारी ते २९ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलं आहे. ग्रामीण भागातून आलेल्या अदितीने शिक्षणाबरोबरच आपल्या कलागुणांना वाव दिल्यामुळे संपूर्ण शहापूर तालुक्यात तिचं कौतुक होत आहे.

# मकर संक्रांतीच्या दिवशी जाधव परिवार साजरी करतो जिजाऊ जयंती

## पंधरा वर्षांची परंपरा जपली



**नांदेड । प्रतिनिधी**

मौजे वाटेगाव येथील जाधव परिवार गेल्या पंधरा वर्षांपासून मकर संक्रांतीच्या दिवशी जिजाऊ जयंती साजरी करत असून, त्यांनी ही परंपरा सांस्कृतिक, सामाजिक, व आध्यात्मिक स्वरूपात जपली आहे. विद्यानंद जाधव पाटील वाटेगावकर आणि त्यांचा परिवार, मकर संक्रांतीच्या दिवशी जिजाऊ मातेच्या प्रतिमेचे पूजन करून तिच्या विचारांचे स्मरण करतात. या निमित्ताने कुटुंबातील सर्व महिला एकत्र येऊन जिजाऊ वंदना गातात, विचारमंथन करतात, आणि एकमेकींना हळदी-कुंकू लावून पारंपरिक उखाण्यांचा आनंद लुटतात. मकर संक्रांतीच्या सणासोबत जिजाऊ जयंती साजरी करताना जाधव परिवारातील महिला व युवतींनी हळदी-कुंकवाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला. स्त्रिया एकमेकींना तीळ-गूळ देऊन मैत्रीचा संदेश देतात. कविता विद्यानंद जाधव, अनुराधा दिगंबर जाधव, सानिका, ईश्वरी, श्रावणी यांच्यासह संपूर्ण जाधव परिवाराने या सोहळ्याला विशेष स्वरूप दिले. या कार्यक्रमामुळे समाजात जिजाऊंच्या विचारांचा प्रचार होण्यास हातभार लागतो. अशा उपक्रमांमुळे संस्कृती व परंपरेचे महत्त्व वाढीस लागते, असे उपस्थितांनी सांगितले.

# कला व विज्ञान महाविद्यालयाचे विशेष श्रम संस्कार एनएसएस शिबिर उत्साहात संपन्न




**पुलगाव । प्रतिनिधी**

नूतन विद्यालय, कवठा येथे कला व विज्ञान महाविद्यालय, पुलगावतर्फे आयोजित विशेष श्रम संस्कार एनएसएस शिबिराचा उद्घाटन सोहळा मंगळवारी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांनी भूषवले.

प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जीवन विमा निगमचे विकास अधिकारी रवी मिश्रा, कवठा रेल्वेचे पोलीस पाटील ज्ञानेश्वर दिवाणे, नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश काशीद, तसेच पत्रकार प्रवीण फुसाटे व हर्षल काळे यांची उपस्थिती होती.

शिबिराची सुरुवात विद्यापीठ गीत, स्वागत गीत आणि गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. शकील खान यांनी केले. त्यांनी शिबिराचे उद्दिष्ट, नियोजन आणि त्याची रूपरेषा स्पष्ट केली. पोलीस पाटील ज्ञानेश्वर दिवाणे यांनी युवकांनी राष्ट्रउभारणीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. भारतीय जीवन विमा निगमचे विकास अधिकारी रवी मिश्रा यांनी युवकांसाठी आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व सांगितले.

मुख्याध्यापक महेश काशीद यांनी श्रम संस्कार शिबिरामुळे युवकांमध्ये सेवा भावनेची जाणीव निर्माण होते, असे मत व्यक्त केले. पत्रकार प्रवीण फुसाटे व हर्षल काळे यांनी एनएसएस २०२४-२५ च्या 'युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजीटल लिटरसी या संकल्पनांवर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक करत शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. शकील खान व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. समीर बगाडे यांचे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमात ६० मुली आणि २५ मुले सहभागी झाली होती. कार्यक्रमाचे कौशल्यपूर्ण संचालन कु. सानिया कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. जुनेरा खान हिने व्यक्त केले.

या शिबिराचे यशस्वी आयोजन प्रा. डॉ. दीप्ती कडू, प्रा. डॉ. नंदकिशोर वरघट, प्रा. विवेक जेधे, कर्मचारी सुमित बनसोड आणि इतर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे शक्य झाले.

विशेष श्रम संस्कार एनएसएस शिबिर हे सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय सेवेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे ठरले असून, विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाने शिबिर अधिकच यशस्वी झाले

# देवळी येथे २४ व २५ जानेवारी २०२५ ला महिला महाराष्ट्र केसरी किताब लढत

**देवळी । प्रतिनिधी**

वर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने वर्धा जिल्हा कुस्तीगीर संघ व सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळी व्दारा आयोजीत महिला महाराष्ट्र केसरी किलाब लढत २०२४-२५ व वरीष्ठ महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धाचे आयोजन विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडीयम देवळी येथे होणार आहे, या स्पर्धेचा उद्यान सोहळा दिनांक २४ जानेवारी २०२५ ला साय. ०७.०० होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन आदिवासी विकासमंत्री . अशोक उईके यांच्या शुभहस्ते व माजी खासदार, नवनीतताई राणा यांच्या अध्यक्षतेखाली, राज्यसभा खासदार, अनिल बोंडे,श्रीष वसंतराव देवपुजारी, अखिल भारतीय संपर्क प्रमुख, संस्कृत भारती, मुख्यालय, नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ पै. संदीप (आप्पा) ऑडवे, सरचिटणीस महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ हिंदकेसरी पै. योगेश दोडके, भाजपा जिल्हाध्यक्ष . सुनिल गफाट, माजी आमदार दादाराव केचे , माजी खासदार . सुरेश वाघमारे, इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

बक्षिस वितरण सोहळा दिनांक २५ जानेवारी २०२५ ला सायं ०७:०० वा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे याच्या शुभहस्ते, केन्द्रीय सहकार व नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री श्री. मुरलीधरजी मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र राज्याचे गृह (ग्रामीण), सहकार, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रसाद महानकर अखिल भारतीय संघटन मंत्री, कीड़ा भारती, मुख्यालय जयपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत, आमदार . समीर कुणावार, आमदार . राजेश बकाने आमदार . प्रताप अडसड, आमदार सुमीत वानखेडे, आमदार उमेश उर्फ बंदु यावलकर व इतर मान्यवरांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

महिला महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२५ करिता ६५ कि. ते ७६ कि वजन गटात, वरीष्ठ महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा वजन गट ५०, ५३, ५५, ५७, ५९, ६२,६५ व ७२ या वजन गटात स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेला महाराष्ट्रातील ३६ जिल्हयातील व महानगरपालीका क्षेत्र असे एकुल ५१ संघ सहभागी होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पहेलवान अमृता पुजारी कोल्हापूर. भाग्यश्री कोळी पुणे, प्रतीक्षा बागडी सांगली, वैष्णवी पाटील कल्याण, स्वाती शिंदे कोल्हापूर, धनश्री कंड नगर, नंदिनी साळोखे कोल्हापूर, आश्लेषा बांगडे सोलापूर यांच्या सह ४०० महिला पहलवान, राष्ट्रीय व आतराष्ट्रीय स्तरावरील पंच, प्रशिक्षक व व्यवस्थापक सहभागी होणार महिला पहलवानाचा वजन गट व तपासनी दिनाक २५ जोनवारी २०२५ ला दुपारी १२.०० पासुन सुरु होईल. स्पर्धेतील महिला महाराष्ट्र केसरी विजेत्या पहेलवानास चादीचा गदा, रोख व इतर विजेत्यांना पुरस्काराचे वितरण होणार आहे.

महिला महाराष्ट्र केसरी किताब लढल २०२४-२५ व वरीष्ठ महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेकरिता महाराष्ट्रातील नामांकित महिला पहेलवान उपस्थित राहणार आहे. या स्पर्धा बघण्यासाठी जास्तीत संख्येने नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी आयोजक महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस व स्वागताध्यक्ष आमदार . राजेश बकाने यांनी केले. यावेळी पत्रकार परिषदेला नाना ढगे माजी जिल्हा परीषद अध्यक्ष, डॉ. नरेद्र मदनकर माजी न.प. उपाध्यक्ष,माजी नगराध्यक्ष शोभा तडस, पंढरी कापसे हिंगणघाट, वर्धा जिल्हा भाजपा सरचिटणीस राहुल चोपड़ा, रवि कारोटकर, शुभांगी पूर्जकार, दिनेश क्षिरसागर, नंदु वेघ शरद आदमने दशरथ भुजाडे, आदिची प्रमुख उपस्थिती होती,उपस्थित होते.

# अमरावती शहरात पाच दिवसीय जागतिक सद्भाव जागृती संमेलन

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती शहरातील 'आनंदघन आध्यात्मिक बहुद्देशिय सेवाभावी संस्था', द्वारा दि. १ ते ५ फेब्रुवारी २०२५ असा पंच दिवसीय 'जागतिक सद्भाव जागृती संमेलन' सोहळा होत आहे. अमरावती शहर येथे वरील संस्थेसह आणखी १३ सत्संगभक्त परिवारांच्या सौजन्याने संपन्न होत आहे. सोहळ्याचे कार्यस्थळ एम.आय.डी.सी. रोडवर शहनाई मंगलम् जुना बासपास रोड, अमरावती असून या 'जागतिक सद्भाव जागृती संमेलना' अंतर्गत दररोज तीन सत्रात विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. आमंत्रित सद्भक्तांचा परस्पर परिचय, सन्माननीय मान्यवरांचे स्वागत, सत्पुरूषांच्या शुभहस्ते संमलनाचे उद्घाटन संमेलनातील सत्रात नियमीत योगवर्ग, सुसंवाद, वैद्यकीय शिबीर, नैसर्गिक पुष्प प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, प्रश्नोतरी चर्चा, प्रवचन, भजन, किर्तन, प्राचीन भारतीय परंपरेवर व्याख्यान, हिंदूसंस्कृतीनुसार विविध आचार-विचार यावर वैज्ञानिक दृष्टीने सुसंगत असा परस्पर संवाद, विविध भाषातील विविध गीतांचा संगीतमय सेवा कार्यक्रम, शास्त्रीय नृत्य, श्री गजानन विजय ग्रंथाचे विविध भाषेतून अध्यायांचे वाचन, उपस्थित परराज्यीय, परप्रांतीय आणि परराष्ट्रीय विचारांचे, संस्कृतीचे वैचारीक आदान-प्रदान, सद्भाव प्रवृत्तीचे वैचारीक मंथन आणि सद्भाव जागृती म्हणून माणुसकीचे ज्वलंत अनुभव असे सेवाकार्य संपन्न होणार आहे. सोबतच संमेलनस्थळी निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, चहा-नाश्ता व्यवस्था इत्यादी सर्व सेवा उपलब्ध असल्याचे जागतिक सद्भाव जागृती संमेलन समिती, अमरावती यांचे तर्फे कळविण्यात आले आहे.

तरी या संमेलनात सहभाग घ्यावा व तन-मन-धनाने सक्रिय सहकार्य करावे, ही सर्व सत्संग परिवाराकडून विनंती करण्यात आली आहे

# ट्रॅव्हल्स ट्रकला धडकली चालक ठार, २७ प्रवासी जखमी

**पुलगाव । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक ९० जवळ एका ट्रॅव्हल्सने उभ्या ट्रकला धडक दिल्याने चालकाचा मृत्यू झाला, तर २७ प्रवासी जखमी झाले आहेत.

पुण्यावरून नागपूरला जाणाऱ्या ट्रॅव्हल्स (क्रमांक एमपी ४५ झेड एफ ओ ८८ ४९) ने ट्रकला धडक दिली. या अपघातात ट्रॅव्हल्स चालक संतोष राम परियार (रहिवासी लातूर) याचा जागीच मृत्यू झाला. ट्रॅव्हल्समध्ये दोन चालक होते. पुण्याहून गाडी चालवत आणणारे चालक महेश बिष्ट हे अपघाताच्या वेळी विश्रांती घेत होते, तर संतोष परियार वाहन चालवत होते.




जखमी प्रवाशांमध्ये प्रतीक धडे (२९, नागपूर), यामीन भरणे (२५, नागपूर), प्रवीण जाधव (५२, नागपूर), अवंती वितोडे (२५, वर्धा) आणि महेश बिष्ट (३८, पुणे) यांचा समावेश आहे. जखमींवर पुलगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू असून घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात आज पालक मेळावा

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील पालक संघाच्या वतीने आज दिनांक १६ जानेवारी २५ रोज गुरुवारला सकाळी ११ वाजता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील पालक वर्ग या मेळाव्यास उपस्थित राहणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि पालकांच्या सूचना मागविण्यात येणार आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीत पालक संघाचा सहभाग अपेक्षित असतो. या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पालक संघाच्या सभेत विद्यार्थी हिताच्या अनेक मुद्यांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन व चर्चा होईल. विवेकानंद (ज्ञानपीठ), कॉन्व्हेंट वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे तथा संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे व पालक संघाचे समन्वयक डॉ. यशवंत घुमे, प्रा.नरेंद्र लांबट यांनी या मेळाव्यासाठी पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## रघुनंदनगिरीजी महाराज यांचा तपपूर्ती सोहळा..

# कार्यक्रमाच काम युद्धपातळीवर हजारो ग्रामस्थ च्या उपस्थितीत सुरू

**गणेश म्हैसमाळे । गंगापूर**

श्री क्षेत्र सरला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तपपूर्ती महासत्संग सोहळ्याचे आयोजन ३० जानेवारी ६ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले असून कार्यक्रमाचे काम युद्ध पातळी चालू असून हजारो सेवेकरी व भाविक सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

हजारो भाविक, महंत यांच्या उपस्थित महंत रघुनंदगिरीजी महाराज यांचा तपपूर्ती सोहळा होणार असून छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील झोडेगाव या गावी हा भव्य सोहळा करण्यात आले आहे या सोहळ्याच्या आयोजना संदर्भात



जोरदार तयारी सुरू असून आधुनिक सोहळा होणार आहे या तयारीची आढवा ह. भ.प.महेंद्र महाराज शेजुळ व ग्रामस्थ याच्या वतीने कार्यक्रमाची स्थळाची पाहणी केली आहे.

या सोहळ्याला येणाऱ्या सेवेकरी भाविकांना कुठली अडचण येऊ नये यासाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. भव्य मंडप उभारण्यात येणारत असून या ठिकाणी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था सुद्धा करण्यात येणार आहे कार्यक्रमाला येणाऱ्या भाविकांना पाणीपुरवठा व्यवस्थित नियोजन केले जाणार आहे, तसेच बाहेरून येणाऱ्या भाविकांना महिला व पुरुष यांची व्यवस्था करण्यात येत आहे या सोहळयाला छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर येथून हजारो सेवेकरी येणार आहे. हा महा सत्संग सोहळा व्यवस्थित पार पाडण्यासाठी देणगी कमिटी, स्वागत कमिटी, स्वच्छता कमिटी, स्वयंपाक अन्नदान कमिटी, महिला कमिटी तयार करण्यात आली आहे


# पुलगावच्या खेळाडूंचे दक्षिण आशिया स्पर्धेत यश

**पुलगाव । प्रतिनिधी**

नुकत्याच कर्नाटकातील मंगला स्टेडियम, मंगळूर येथे झालेल्या साऊथ एशियन मास्टर्स ॲथलेटिक स्पर्धेमध्ये पुलगावच्या देवेंद्र सोनटक्के आणि प्रा. प्रवीण शेळके यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

देवेंद्र सोनटक्के यांनी ११० मी. हर्डल्स, भालाफेक स्पर्धांमध्ये भाग घेतला. भालाफेक प्रकारात त्यांनी वयोगटात पाचवा क्रमांक मिळवला. तर प्रा. प्रवीण शेळके यांनी ५ कि.मी. चालणे आणि ११० मी. हर्डल्समध्ये सहभाग घेत चौथा क्रमांक मिळवला. या स्पर्धेमध्ये वर्धा जिल्ह्यातून एकूण ११ खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. अनेक खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करत जिल्ह्याचा सन्मान वाढवला. स्पर्धेत श्रीलंका, नेपाळ, फिलिपिन्स, अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांसारख्या देशांतील खेळाडू सहभागी झाले होते.

स्थानिक नागरिकांनी देवेंद्र सोनटक्के आणि प्रा. प्रवीण शेळके यांच्या यशस्वी कामगिरीचे कौतुक करत त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर रस्ता सुरक्षा अभियान संपन्न

**कोपरगाव । प्रतिनिधी**

सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवितांना प्रत्येकाचा जीव महत्वाचा आहे, जानेवारी महिन्यात संपुर्ण देशात सुरक्षा अभियान राबवुन वाहतुक नियमांची जनजागृती केली जाते. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर बुधवारी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यांत आले. प्रादेशिक परिवहन अधिकारी (श्रीरामपुर) श्री. विशाल मोरे यांनी उसतोडणी चालक मालकांसह कारखान्याच्या कामगारांना रस्त्यावर वाहन चालवितांना काय काळजी घ्यायची याची माहिती दिली.

प्रारंभी अमृत संजीवनीचे चेअरमन श्री. पराग संधान यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षस्थानी कारखान्याचे उपाध्यक्ष मनेष गाडे होते. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बाजीराव जी. सुतार प्रास्तविक करतांना म्हणाले की, माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी उस उत्पादक सभासद, कामगार यांच्याबरोबरच उसतोडणी वाहतुकदार, कामगार यांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य देत राज्यात सर्वप्रथम त्यांचा (गन्ना किसान पॉलिसी) जनता अपघात विमा उतरवत कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे हे काळानुरूप त्यात सातत्याने बदल करत आवश्यक त्या सुविधा पुरविण्यांवर भर देत आहेत.

श्रीरामपुर प्रादेशिक परिवहन विभागाचे सहायक अधिकारी श्री. पांडुरंग सांगळे रस्ता सुरक्षा अभियानाविषयी बोलतांना म्हणाले की, देशात दरवर्षी सुमारे साडेचार लाख अपघात होवुन त्यात १ लाख ६० हजार व्यक्तींचा मृत्यु होतो. जगाच्या तुलनेत भारतात १ टक्के वाहने आहेत पण वाहन अपघातात मृत्युचे प्रमाण सर्वाधित १३ टक्के आहे. ९० टक्के अपघात हे मानवी चुकांमधुन होतात तेंव्हा दुचाकीस्वारांनी हेल्मेट, चारचाकी वाहनधारकांनी सीटबेल्टचा वापर हा केलाच पाहिजे. उस गाळप हंगामात तोडणी वाहतुकदार, चालक-मालक मोठ्या आवाजात गाणी वाजवुन वाहने चालवितात, मद्यपानासह अंमली पदार्थांचे सेवन करून मोबाईलचा सर्रास वापर करतात त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढुन त्यात निरपराध व्यक्तींचे बळी जात आहेत त्यासाठी प्रत्येकाने स्वतः बरोबरच इतरांच्या जीवाची पर्वा केली पाहिजे.

याप्रसंगी संचालक सर्वश्री. रमेश घोडेराव, रमेश आभाळे, ज्ञानदेव औताडे, विलासराव माळी, राजेंद्र कोळपे, माजी सभापती सुनिल देवकर, बापूराव औताडे, अॅडमिनीस्ट्रेटीव्ह मॅनेजर प्रकाश डुंबरे, एच. आर. मॅनेजर विशाल वाजपेयी, लेबर ऑफिसर एस. सी. चिने, सिक्युरिटी ऑफिसर रमेश डांगे, अमृत व सुवर्ण संजीवनी शुगरकेन संस्थेचे सर्व पदाधिकारी संचालक, कारखान्याचे कर्मचारी, उसतोडणी वाहतुकदार मालक मोठया संख्येने उपस्थित होते. सुरक्षा अधिकारी श्री. सलमान शेख यांनी उपस्थित कामगारांना सुरक्षेची शपथ दिली. श्रीरामपुर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने बैलगाडी व ट्रक, ट्रॅक्टर यांना रात्रीचे वेळी उसवाहतुक करतांना सुरक्षेसाठी रेडीयम पट्टया लावण्यांत येवुन दुचाकीस्वारांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यांत आले. सुत्रसंचलन केशव होन यांनी केले. शेवटी संचालक राजेंद्र कोळपे यांनी आभार मानले.



# बंदुकीने उडवून देऊ अशी धमकी देणाऱ्यांस अटक करा

## उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याला निवेदनातून मागणी

**उमरखेड । प्रतिनिधी**

पोफाळी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले डोंगरगाव येथे अवैध रेती उत्खनन व गौण खनिज वाहतूकीची गोपनीय माहिती प्रशासनाला देत असल्याच्या कारणावरून येथील दोघांनी पत्रकारास बंदुकीने उडवून देऊ अशी जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे सदर धमकी देणाऱ्यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करा अशा आशयाची निवेदन तालुक्यातील पत्रकारांनी आज रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांना निवेदन दिले आहे .महागाव तालुक्यातील डोंगरगाव येथे अवैध प्रमाणात रेती उत्खनन सुरू असून याबाबतची माहिती प्रशासनाला का देतो या कारणावरून येथील पत्रकार प्रशांत देशमुख यांना बंदुकीने उडवून जीवाने मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सय्यद मोसिन सय्यद रऊफ व सय्यद मुजबीर सय्यद जमील यांच्यावर पोफळी पोलीस स्टेशन यांनी गुन्हे दाखल केले असून अद्यापही त्यांना अटक होऊन जामीन झाला असून त्याच्यांवर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करा व अटक करा असे निवेदनातून म्हटले आहे .डोंगरगाव येथे अनेक प्रकारचे अवैध धंदे सुरू असून महसूल व पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत का ? या गावात गेल्या काही वर्षात देशी कट्टे मिळणे , देशी कट्टे हातात घेऊन दहशत निर्माण करणे असे प्रकार यापूर्वी सुद्धा घडले असून यामध्ये पुसद येथील स्थानिक गुन्हे शाखेने कारवाही सुद्धा केली आहे असे प्रमाण घडले असतानाही सदरील आरोपींना कायद्याचे धाक नसल्यामुळे अवैध धंद्याच्या माध्यमातून गावांमध्ये दहशत निर्माण करून व तेथील पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देऊन गावात एका प्रकारची दहशत निर्माण करण्याचा प्रकार तेथील गावगुंड करीत असून तेथील दहशत कमी करावी असे आशयाचे निवेदन तालुक्यातील पत्रकारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिले आहे व त्यांच्यावर कठोरपणे व पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करून तात्काळ अटक करावी अशा आशयाचे निवेदन दिले आहे यावेळी तालुक्यातील शहर व ग्रामीण भागातील सर्व पत्रकार उपस्थित होते



# सरपंच देशमुख यांच्या खूनातील आरोपींना फाशीची मागणी-वाळूज ग्रामस्थांचे एकदिवसीय उपोषण

**मोहोळ । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील सर्व आरोपींना फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी वाळूज (ता. मोहोळ) येथील ग्रामस्थ व युवकांनी मकरसंक्रांतीच्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.

उपोषणात वाळूज व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सकल मराठा समाज व बहुजन बांधवांनी एकत्र येत या खुनातील मुख्य सूत्रधारांना पकडून कठोर शिक्षा करण्याची मागणी केली.

सरपंच संतोष देशमुख यांचा अमानुष खून करून माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या कृत्यातील आरोपींवर कठोर कारवाई करण्यास उशीर होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे. उपोषणकर्त्यांनी या खुनातील सर्व आरोपींना अटक करून फास्टट्रॅक कोर्टात जलद खटला चालवण्याची मागणी केली.तसेच, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणातील आरोपींवरही कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. ज्योत्स्ना पाटील, जिल्हा कार्याध्यक्षा, राष्ट्रवादी महिला आघाडी, सोलापूर म्हणाल्या, संतोष देशमुख यांच्या खुनातील आरोपींनी अमानुषपणे हाल हाल करून त्यांचा खून केला आहे. अशा निर्ढावलेल्या गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी. मोहोन कादे, वाळूज यांनी प्रतिक्रिया देतानासांगितले, सरकारने कठोर पावले उचलली नाहीत, तर राज्यभर गुंडगिरी आणि झुंडशाही माजेल. सामान्य माणूस सुरक्षित राहणार नाही. त्यामुळे तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत उपोषण करण्यात आले. यावेळी रमेश पाटील, कुमार कादे, ज्योत्स्ना पाटील, संजय क्षीरसागर, सतीश पाटील, जयवंत जाधव, श्रद्धानंद ताकभाते, दीपक मोटे आदींसह शेकडो ग्रामस्थ व युवक उपस्थित होते



## पाथरी बाजार समीतीच्या सभापतीपदी अनिल नखाते कायम

# विभागीय सह निबंधकांनी जिल्हा उपनिबंधकाचे आदेश केले रद्द

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**

पाथरी बाजार समितीचे सभापती अनिल नखाते यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या जुन्या प्रकरणात नखाते यांचे संचालक पद रद्द करण्याचा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांनी काढलेला १४ ऑक्टोबर २०२४ चा आदेश छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी रद्द केला आहे. त्यामुळे अनिल नखाते याची सभापतीपदी वर्णी कायम राहीली आहे.

संचालक एकनाथ घांडगे व ईतर ४ जणांच्या जुन्या तक्रारीनुसार अनिल नखाते यांना महाराष्ट्र बाजार समितीच्या नियम २०१७ मधील नियम १० (१) नुसार संचालकपदी १० आँक्टोबर २०२४ रोजी अपात्र घोषित केले या निर्णयाविरुद्ध अनिल नखाते यांनी १६ आँक्टोबर रोजी विभागीय सहनिबंधक छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे अपील दाखल केले आहे.यामध्ये १८ आँक्टोबर रोजीच्या सुनावणीत हस्तक्षेपक म्हणून अमोल बांगड व शाम धर्मे यांनी अर्ज दिला याप्रकरणात प्रतिवादीची संख्या १० अशी झाली.या प्रकरणात ५ वेळा सुनावणी घेण्यात आली. यामध्ये अनिल नखाते यांच्या वतीने अँड.जि.व्ही.सुकाळे यांनी केलेल्या युक्तीवादात अनिल नखाते यांना सभापती पदावरून हटविण्यासाठी केवळ राजकीय हेतून केलेल्या तक्रारी अनुषंगाने आव्हानीत आदेश हे चुकीचे आहेत. कारण प्रस्तुत प्रकरणात नखाते यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी देण्यात आलेली नाही.नखाते यांच्या अपात्रतेसाठी हेतुपुरस्सर कंपनीचा संबध लावला गेला आहे. तसेच नखाते यांना देण्यात आलेल्या दि. २८.०५.२०२४ रोजीच्या नोटीसमध्ये उत्तर देण्यासाठी कोणतेही आरोप नमूद करण्यात आलेले नाही.प्रकरण ३१ जुलै रोजी निकालासाठी बंद केले असतांनाही १ आँगष्ट रोजी सचिव यांचा स्वतंत्र अहवाल कसा घेतला.या सर्व बाबी विचारात घेता नखाते यांचे संचालक पद रद्द करण्याचा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी दि. १४.१०.२०२४ रोजीचे आव्हानित आदेश रद्द करण्यात यावे असे मत मांडले.या प्रकरणात प्रतिवादी यांचे वतीनेही अँड.एम.आर.चौधरी,अँड.के.जे. सुर्यवंशी, अँड.मनिष त्रिपाठी यांनी युक्तिवाद केला.दोन्ही बाजुचा युक्तिवाद ग्राह्यधरुन छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी ३१ डिसेंबर रोजी अनिल नखाते यांना संचालक म्हणून अपात्र ठरविणारा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांचा १४ ऑक्टोबर २०२४ चा आदेश रद्द केला आहे.तसेच हे प्रकरण फेरनिर्णयार्थ प्रतिप्रेषीत' करण्यात आले आहे असे आदेशीत केले.या निर्णयामुळे अनिल नखाते यांचे सभापतीपद कायम राहीले आहे.



# प्रियदर्शिनी आय.टी.आय. मध्ये 'राष्ट्रीय युवा दिन' साजरा

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळ भद्रावती द्वारा संचालीत प्रियदर्शिनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी. आय.), भद्रावती येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय युवा दिन' तसेच विद्यार्थी-पालक मेळावाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थाध्यक्ष धनंजय गुंडावार यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष प्राचार्य पि. व्ही. बालसराफ व प्रमुख मार्गदर्शक नियुक्त आय.एम.सी. सदस्य एच.एस. शहा (गुप्ता इंजिनिअरिंग), पि.पि. झाडें (हिरो शोरूम) तसेच कुणाल चाफले (चाफले फायब्रिकेशन) हे होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद व प्रियदर्शिनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस मालर्पण व दीपप्रज्वलित करून झाली.

अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेचे प्राचार्य बालसराफ यांनी संस्थेविषयी माहिती देत प्रशिक्षणार्थ्यांना व पालकांना रोजगाराचे महत्व पटवून पालकांच्या विविध समस्यांचे निराकरण केले. तसेच 'राष्ट्रीय युवा दिना' निमित माजी गुणवंत प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार समारंभ करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन स्वेताली चौधरी, आभारप्रदर्शन मेघा डोये यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता संस्थेच्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी तसेच सर्व कर्मचारीवर्गानी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



## रघुनंदनगिरीजी महाराज यांचा तपपूर्ती सोहळा

# कार्यक्रमाच काम युद्धपातळीवर हजारो ग्रामस्थ च्या उपस्थितीत सुरू

**गंगापूर । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र सरला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तपपूर्ती महासत्संग सोहळ्याचे आयोजन ३० जानेवारी ६ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले असून कार्यक्रमाचे काम युद्ध पातळी चालू असून हजारो सेवेकरी व भाविक सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

हजारो भाविक, महंत यांच्या उपस्थित महंत रघुनंदगिरीजी महाराज यांचा तपपूर्ती सोहळा होणार असून छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील झोडेगाव या गावी हा भव्य सोहळा करण्यात आले आहे या सोहळ्याच्या आयोजना संदर्भात जोरदार तयारी सुरू असून आधुनिक सोहळा होणार आहे या तयारीची आढवा ह. या सोहळ्याला येणाऱ्या सेवेकरी भाविकांना कुठली अडचण येऊ नये यासाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. भव्य मंडप उभारण्यात येणारत असून या ठिकाणी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था सुद्धा करण्यात येणार आहे कार्यक्रमाला येणाऱ्या भाविकांना पाणीपुरवठा व्यवस्थित नियोजन केले जाणार आहे, तसेच बाहेरून येणाऱ्या भाविकांना महिला व पुरुष यांची व्यवस्था करण्यात येत आहे या सोहळ्याला छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर येथून हजारो सेवेकरी येणार आहे. हा महा सत्संग सोहळा व्यवस्थित पार पाडण्यासाठी देणगी कमिटी, स्वागत कमिटी, स्वच्छता कमिटी, स्वयंपाक अन्नदान कमिटी, महिला कमिटी तयार करण्यात आली आहे



भ.प.महेंद्र महाराज शेजुळ व ग्रामस्थ याच्या वतीने कार्यक्रमाची स्थळाची पाहणी केली आहे.